# विसर्जन मिरवणुकीची मध्यरात्री एक वाजता सांगता

## पंचवीस मंडळांचा सहभाग

**नाशिक| प्रतिनिधी**

ढोल-ताशांच्या निनादात विघ्नहर्त्यावर फुलांची उधळण करुन भरपावसात जड अंत:करणाने नाशिककरांनी लाडक्या गणरायाला निरोप दिला. त्याचवेळी शनिवारी (दि.६) शहरातील पारंपरिक मुख्य गणेश विसर्जन मिरवणूकही अतिशय जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडली.

पोलिसांचा 'पॉईंट टू पॉईंट' कडेकोट पहारा आणि मंडळांना मिरवणूक पूर्ण करण्यासाठी दिलेला विहित अवधी यामुळे मिरवणूक शांततेत पार पडली. कुठेही अप्रिय घटना घडल्याचे दिसून आले नाही. नियमांचे तंतोतंत पालन करुन मुख्य मिरवणुकीत मार्गस्थ झालेल्या मंडळांनी पोलीस आयुक्तांच्या सूचनेनुसार मध्यरात्री बारा वाजता डीजे बंद करुन पारंपरिक वाद्यांच्या तालावर जल्लोष सुरू ठेवला. पहिल्यांदाच तब्बल तेरा तासांनी मध्यरात्री एक वाजता विसर्जन मिरवणुकीची सांगता झाली.

भद्रकाली येथील वाकडी बारव येथून शनिवारी (दि. ६) सकाळी साडेअकरा वाजता नाशिक महापालिकेच्या 'श्रीं'ची आरती करून विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला. जलसंसाधन मंत्री गिरीश महाजन, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार देवयानी फरांदे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, पोलीस उपायुक्त मोनिका राऊत, किरणकुमार चव्हाण, चंद्रकांत खांडवी, सहाय्यक आयुक्त संदीप मिटके, नितीन जाधव, संगीता निकम यांच्यासह वरिष्ठ निरीक्षक, सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष समीर शेटे, माजी महापौर विनायक पांडे यांसह मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी उपस्थित होते. महापालिकेच्या गणपती पाठोपाठ मानाच्या मंडळांची मिरवणूक पुढे सरकली. ढोलपथकांची सलामी दिली असतानाच पावसाच्या हलक्या सरींमुळे मिरवणूक पुढे सरकली. सकाळी साडेअकरा ते सायंकाळी पाचपर्यंत पावसामुळे मंडळांचे पदाधिकारी, ढोल वादक व पोलीस यंत्रणेशिवाय मिरवणुकीत नाशिककरांचा सहभाग तुरळक होता. सायंकाळी सहानंतर नाशिककरांची पावले मिरवणुकीकडे वळली. मानाचे गणपती 'वेळेत' मार्गस्थ झाल्याने सोहळ्याची रंगत वाढली. त्यातच पोलिसांनी मध्यरात्री बारानंतरही पारंपरिक वाद्यांसह मिरवणुकीला परवानगी दिल्याने मंडळांचा उत्साह अधिक वधारला. काहीसा गोंगाट व किरकोळ वाद वगळता अतिशय शिस्तबद्धरित्या रात्री ठीक एक वाजता मिरवणुकीची सांगता करण्यात आली. वेळेत प्रारंभ झालेल्या मिरवणुकीतील सर्व मंडळांनी 'टाइम स्लॉट'चे पालन करण्यावर भर दिला. एका चौकांत वीस मिनिटे वादन करण्यासह डीजेचाही आवाज मर्यादित ठेवला.

रात्री आठपर्यंत पहिल्यांदाच सर्व मंडळे दूध बाजाराच्याही पुढे पोहोचल्याचे दिसून आले. तर, शिवसेवा मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत शंकर भगवान, हनुमान यासह देवीदेवतांच्या अवतारात कलाकार सहभागी झाले. हरियाणा येथून आलेल्या कलाकारांसोबत फोटो घेण्यासाठी भक्तांनी गर्दी केली. या कलाकारांनी सादर केलेले भस्म व अग्नी नृत्य मिरवणुकीचे आकर्षण ठरले. दरम्यान, रात्री साडेसहानंतर मिरवणुकीत तरुणाईसह कुटुंबीयांची गर्दी वाढली. ढोलपथकांच्या दोऱ्यांमुळे मेहेर, अशोक स्तंभ, सांगली बँक सिग्नल, रविवार कारंजा या ठिकाणी नागरिकांना पुढे चालणेही शक्य नव्हते. साध्या वेशातील पोलिसांसह महिला व पुरुष कर्मचाऱ्यांनी त्वरित मंडळांना पुढे जाण्याच्या सूचना केल्या. शहरातील पोलीस ठाण्यांच्या गणेशमूर्तींचे शुक्रवारी व शनिवारी (दि. ५ व ६) ढोलताशांच्या निनादात थाटात विसर्जन करण्यात आले.

### गल्लोगल्ली पार्किंगने खोळंबा

मिरवणुकांमध्ये सहभागी होऊ लागल्याने उपनगरातून आलेल्या मंडळींनी आपली वाहने शहरातील गल्ल्यांमध्ये लावण्यास सुरुवात केली. यामुळे वाकडी बारव-कादर मार्केटमार्गे, फुले मंडई, अब्दुल हमीद चौक, बादशाही कॉर्नरवरून गाडगे महाराज पुतळा, धुमाळ पॉईंट, सांगली बँक सिग्नल, मेहेर सिग्नल, अशोकस्तंभ, रविवार कारंजामार्गे मालेगाव स्टँडवरून गोदाकाठापर्यंत मार्गावरील गल्ल्या वाहनांनी भरल्या होत्या. मेहर सिग्नल आणि अशोकस्तंभ हा मिरवणुकीतील प्रमुख चौक असल्याने गोळे कॉलनीसह अशोकस्तंभामागील भागातील गल्ल्या, पोलीस मुख्यालयात चारचाकी आणि दुचाकी वाहनांनी गच्च झाला होता. यामुळे वाहतूक खोळंबली होती.

### ...अन् महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर

मिरवणूक शिस्तबद्धरित्या सुरू असल्याने सर्वांचे आभार मानत न्यायालयीन आदेशाप्रमाणे मध्यरात्री बारानंतर पारंपरिक वाद्यांसह मिरवणूक सुरू ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी जाहीर केला. ध्वनिक्षेपकावरुन त्यासंदर्भात मंडळांना कळविण्यात आले. तर सोशल मीडियावरही माहिती प्रसारित झाली. त्यानंतर मंडळांनी एकच जल्लोष करुन पोलिसांचे आभार मानले.

### अन् निषेधाचे फलक झळकले

रात्री पावणे नऊ वाजता मध्यरात्री १२ नंतरही मिरवणूक सुरू ठेवण्याबाबत पोलिसांचा निर्णय

- ही पारंपरिक क्रमावर पद्धत नाही, नाशिक गणेशोत्सव महामंडळाचा जाहीर निषेधफअसे फलक मध्यरात्री १२.१० वाजता झळकले
- एका मंडळाने विशिष्ट आशयाचे फलक झळकावले
- मध्यरात्री १२.३९ वाजता भोईराज मित्र मंडळाच्या मिरवणुकीत पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी पारंपरिक वाद्यावर ठेका धरला
- मध्यरात्री १२.४५ वाजता दंडे हनुमान मित्र मंडळाच्या मेहेर येथील मंडपाजवळ तरुणीची छेड; तरुणाचा चोप; काहीवेळ तणाव
- पोलिसांनी गर्दी पांगविली, रितसर तक्रार देण्याची संबंधितांना सूचना

### महत्त्वाचे मुद्दे

- सकाळी ११.३० वाजता मिरवणुकीला प्रारंभ
- पावसामुळे चित्ररथ, ढोलपथके व मान्यवर उशिराने दाखल
- सकाळी साडेदहा वाजता बंदोबस्त दाखल
- बीडीएसकडून चित्ररथांची तपासणी
- मिरवणुकीवर ड्रोनसह सीसीटीव्हींची नजर
- २५ मंडळे, ३० पेक्षा जास्त ढोलपथके, सटाणा ढोल, डीजेचा आवाज
- अबालवृद्धांच्या सहभागाने चैतन्य
- सायंकाळी साडेपाच वाजता पहिल्या मंडळाचे गणेश विसर्जन
- गंगापूररोड, अशोकस्तंभ, सीबीएसकडे वाहनांची पार्किंग
- व्हिडिओ, फोटो, रील्स करण्यात ढोलपथकांसह भक्तांची चढाओढ

# मनपाकडून सव्वादोन लाख गणेशमूर्ती संकलित

## यंदा वीस हजारांची वाढ; पर्यावरण रक्षणासाठी नाशिककरांचा मोठा प्रतिसाद



**नाशिक | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाला यंदाही नाशिककरांनी पर्यावरणपूरक स्वरूप दिले असून महापालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत नागरिकांनी थेट नदीत गणेशमूर्ती विसर्जन न करता त्याऐवजी मूर्तीदान करण्याचा पर्याय स्वीकारला. या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. मनपाने यंदा तब्बल २,२६,१७७ गणेशमूर्ती संकलन केल्या. मागील वर्षी हा आकडा २,०५,८५४ इतका होता. यंदा २० हजार ३२३ मूर्तींची वाढ झाली आहे.

महापालिकेकडून शहरातील सहा विभागांत तसेच महत्वाच्या ठिकाणी मूर्तीदान केंद्रे उभारण्यात आली होती. विसर्जनाच्या काळात भाविकांना केंद्रावर येऊन मूर्तीदान करण्याचे आवाहन करण्यात आले होते. भाविकांनीही पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्व ओळखून नदी, विहिरी आणि तलावांमध्ये मूर्ती विसर्जन टाळत मोठ्या संख्येने मूर्तीदान केले. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत महत्वाचा ठरला आहे. नद्यांमधील पाण्याचे प्रदूषण, प्लास्टिक व थर्माकोलचा अपव्यय तसेच जलचरांवर होणारा विपरित परिणाम टाळण्यासाठी मूर्तीदान हा परिणामकारक पर्याय आहे. शिवाय, भाविकांच्या सहकार्यामुळे नदीपात्रातील गाळ व पाण्याच्या गुणवत्तेवर होणारा नकारात्मक परिणाम लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. गणेशोत्सवाचा आनंद घेतानाच पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी पार पाडण्याचे नाशिककरांचे भान कौतुकास्पद आहे.

### विभागनिहाय संख्या

पंचवटी विभागात सर्वाधिक ९०,२६९ मूर्ती संकलित झाल्या. पंचवटीतील गोदावरी नदीकाठी मोठ्या प्रमाणावर विसर्जन होत असल्याने येथे मोठी गर्दी पाहायला मिळाली. त्यानंतर नाशिक रोड विभागात ५०,८७६ गणेश मूर्ती संकलित करण्यात आल्या. या विभागात खास करून रेल्वे स्टेशन परिसर, देवळाली, इंदिरानगर भागातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. नवीन नाशिक विभागात २९,८६७ तर सातपूर विभागात २२,७९२ मूर्ती संकलित झाल्या. औद्योगिक क्षेत्र असल्याने येथील रहिवासी आणि कामगारांनी पर्यावरणपूरक विसर्जनासाठी मनपाला चांगला प्रतिसाद दिला. तर पूर्व विभागात २१,०४५ आणि पश्चिम विभागात** ११,३२८ मूर्ती संकलित करण्यात आल्या.

# मनपा आयुक्तांचे सासूंसोबत ढोलवादन

**नाशिक | प्रतिनिधी**

शनिवारी शहरात गणेशोत्सव निमित्त गणरायाला निरोप देण्यासाठी काढण्यात आलेल्या भव्य विसर्जन मिरवणुकीत भाविक, मान्यवर आणि नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला होता. तर ढोल-ताशांच्या गजरात, पारंपरिक वेशभूषेत आणि भक्तीमय वातावरणात शहर दुमदुमून गेले. यावेळी एक विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या मातोश्री रूपाराणी शर्मा यांचा सहभाग.

रूपाराणीशर्मायांनीमिरवणुकीत उपस्थित राहून पारंपारिक ढोल वादनाचा आनंद घेतला. ढोल-ताशांच्या गजरात, नृत्य, रंगीबेरंगी पोशाख, भगवे झेंडे आणि भक्तीमय घोषणांनी नाशिकचे विसर्जन सोहळा अधिकच उत्साहपूर्ण झाला होता. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या मातोश्रींच्या उपस्थितीमुळे मिरवणुकीत वेगळाच उत्साह पाहायला मिळाला.



मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री ह्या जिल्हाधिकारी शर्मा यांच्या पत्नी आहे. त्यामुळे मनपा आयुक्तांनी सासूसोबत ढोलवादन केले. यंदा नाशिक महानगरपालिकेच्या वतीने पर्यावरणपूरक विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, स्वच्छता मोहिमा आणि निर्माल्याचे वेगळे संकलन यांसारखे उपक्रम राबविण्यात आले. नाशिककरांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वच्छ व हरित गणेशोत्सवाचा संदेश दिला.

# मंत्री गिरीश महाजनांनी वाजवला ढोल तर आ. फरांदे यांनी टाळ वाजवत दिली साथ

**नाशिक | प्रतिनिधी**

लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी जुने नाशिक येथील पारंपरिक मार्गावरून विसर्जन मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी जलसंपदा सिंहस्थ मंत्री गिरीश महाजन यांनी ढोल वाजवला तर मध्य नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांनी टाळ वाजवत साथ दिली. पावसाचे सरींमध्ये गणेश विसर्जन मिरवणूक सुरू झाली होती. जुने नाशिक येथील ऐतिहासिक चौक मंडई येथून सकाळी दहा वाजेच्या सुमारास पहिल्या महापालिकेच्या मानाच्या गणपतीला पुष्पहार अर्पण करून तसेच मिरवणुकीचे नारळ फोडून विसर्जन मिरवणूक सुरू करण्यात आली.



# एकशे सत्याहत्तर मेट्रिक टन निर्माल्याचे संकलन

**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिक शहरातील गणेशोत्सव उत्साहात पार पडला असून, विसर्जनानंतर मनपाच्या वतीने एकूण १७६.५७५ मेट्रिक टन म्हणजेच १,७६,५७५ किलोग्रॅम निर्माल्याचे संकलन करण्यात आले. स्वच्छता मोहिमेसाठी मनपाच्या ८३ वाहनांचा वापर करण्यात आला होता.

मनपाने यंदा विसर्जनावेळी पर्यावरणपूरक उपक्रमांवर विशेष भर दिला होता. गोदावरी घाट, कृत्रिम तलाव, नदीकाठ आणि शहरातील विविध विसर्जन स्थळांवर मोठ्या प्रमाणात निर्माल्याचे संकलन केंद्र उभारण्यात आले होते. येथे नागरिकांना निर्माल्याचे वेगळे संकलन करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

नाशिककरांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मनपाच्या स्वच्छता विभागाने या कामासाठी विशेष पथके नेमली होती. विसर्जनानंतर लगेचच घाट परिसरातील आणि शहरातील निर्माल्याचे संकलन करून ते पुढील प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात आले. मनपाच्या वतीने नागरिकांसाठी हरित गणेशोत्सव मोहीम राबविण्यात आली होती. घरगुती मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची सोय, प्लास्टिक वापरावर नियंत्रण, कचरा व्यवस्थापन आणि निर्माल्याचे वेगळे संकलन यावर विशेष लक्ष देण्यात आले.

### विभागनिहाय आकडेवारी

| विभाग | वाहन संख्या |
| --- | --- |
| नाशिक पूर्व १८.४५० मे.टन | ११ |
| नाशिक पश्चिम १९.६५५ मे.टन | ११ |
| नाशिक रोड २२.१४५ मे.टन | १२ |
| पंचवटी ४५.९४५ मे.टन | १५ |
| नवीन नाशिक ३२.८८० मे.टन | १७ |
| सातपूर ३७.५०० मे.टन | १७ |

यंदा विसर्जनावेळी मनपाच्या वतीने पर्यावरणपूरक उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला होता. शहरातील विविध विसर्जन स्थळांवर निर्माल्याचे वेगळे संकलन करण्यासाठी विशेष केंद्रे उभारण्यात आली होती. नागरिकांना निर्माल्याचे वर्गीकरण करण्याचे आवाहन करण्यात आले होते आणि नाशिककरांनी त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

■ **अजित निकत,** संचालक, घनकचरा व्यवस्थापन, मनपा

# ... अन गणेश विसर्जन मिरवणुकीत वाजले 'भर दो झोली मेरी या मोहम्मद'

**जुने नाशिक | प्रतिनिधी**

नाशिकच्या मानाच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत अनेक वेळा एकात्मतेचे दर्शन घडले आहे. दोन वर्षांपूर्वी माजी महापौर विनायक पांडे यांच्या मंडळाने मशिदीतून आजान सुरू झाल्यावर वाद्य बंद केले होते, हे बातमी देशभर गाजली होती.

तर शनिवारी दुपारी चौक मंडई येथून निघालेल्या पारंपरिक गणेश विसर्जन मिरवणुकीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगरसेवक शाहू खैरे यांचा मंडळ शहीद अब्दुल हमीद चौक दूध बाजार येथे पोहोचल्यावर मंडळाच्या डिजे मधून थेट मुस्लीम बांधव जी कव्वाली ऐकत राहतात ती कव्वाली भर दो झोली मेरी या मोहम्मद वाजवण्यात आल्यामुळे एकात्मतेचा अनोखा संदेश पुन्हा नाशिक मधून मिळाला.

# मनपा अधिकाऱ्यांचे नृत्य



**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मिरवणुकीत उत्साहात सहभाग घेतला होता. यावेळी त्यांनी नृत्याचा ठेका धरला होता. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, अजित निकत, शहर अभियंता संजय अग्रवाल, अधीक्षक अभियंता अविनाश धनाईत, कार्यकारी अभियंता नितीन पाटील, गणेश मैड, प्रशांत पगार, रवींद्र बागुल, रवी पाटील, दीपक मालवाल, समीर रकेट, विभागीय अधिकारी राजाराम जाधव, चंदन घुगे, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद या सर्वांनी उत्साहाने नृत्याचा ठेका धरत मिरवणुकीत सहभाग घेतला.

# शिवतांडव नृत्य पथकाने भरला रंग

**जुने नाशिक | प्रतिनिधी**

शहरातील मानाच्या श्री गणेश विसर्जन मिरवणुकीत यंदा माजी महापौर विनायक पांडे यांच्या शिवसेवा युवक मित्र मंडळातर्फे सादर करण्यात आलेल्या शिवतांडव नृत्य पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. या पथकात हरियाणा येथून विशेष मागवलेले कलाकार सहभागी झाले होते.

पथकातील कलाकारांनी विविध देव-देवतांच्या वेषभूषा परिधान करून मनमोहक नृत्य सादर केले, त्यामध्ये शंकर-पार्वती, बालाजी हनुमान तसेच इतर पौराणिक स्वरूपांचे आकर्षक दर्शन घडले. या पथकाचे विशेष आकर्षण म्हणजे नंदीवर बसून शंकर व पार्वतीने सादर केलेले नृत्य होते. या भव्य आणि देखण्या सादरीकरणामुळे विसर्जन मिरवणुकीचे सौंदर्य अधिक खुलले होते. संपूर्ण मिरवणूक भक्तिरस, ऊर्जा आणि पारंपरिक साजशृंगाराने भारून गेली होती. या संकल्पनेमागे माजी महापौर विनायक पांड व युवा नेते ऋतुराज पांड यांचा पुढाकार होता. पथकाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे संदीप कानडे, सचिन बांडे, संदेश फुले, अनिल क्षत्रिय, दत्ता क्षीरसागर, दीपक चौघुले, घनश्याम परदेशी, रोहितसिंग (शिवा) चोहान, सुनील कोथमिरे, किरण फुले, दिलीप जाधव, प्रदीप शेलार, विजय जगताप, श्याम बनछोडे, मानव फुले, श्लोक क्षीरसागर, कृष्णा जाधव, ओमकार जाधव, दिनेश साठे, वैभव वालझाडे, कमलाकर नागपुरे, बंटी पाटील, सुयोग जाधव आणि राजू गज्जर यांनी विशेष परिश्रम घेतली. नाशिककरांसाठी हा देखावा भक्तीभाव, कला आणि संस्कृतीचे उत्कृष्ट दर्शन घडवणारा ठरला.



